**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, 5, बी. जे. रोड, पुणे. 01 दुरध्वनी क्र. 020 29706411,

ई-मेल : ac.scea1518@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र.1/2021**

**भाडे तत्वावर वाहनचालकासह, इंधनासह, वाहन पुरवठा करणेसाठी, ई-निविदा**

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व सहकारी संस्था व सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुक कामी दौरा व दैनंदिन कामाकरीता वाहन पुरवठादारांकडून भाडेतत्वावर वाहन पुरवठा करण्यासाठी ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

वाहन प्रकार :- Honda city/ Ciaz/ Swift Desire /Ameze/ Toyota Etios/Ertiga/Figo aspire/(AC) व समकक्ष

वाहनाचा रंग :- पांढरा आवश्यक संख्या :- 1

निविदा वेळापत्रक :-

1) ऑनलाईन ई-निविदा अर्ज विक्रीचा दिनांक :- दिनांक 15-02-2021 ते दि. 01-03-2021

2) ऑनलाईन ई-निविदा अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक :- दिनांक 01-03-2021 दुपारी 12.00 पर्यंत

3) ई-निविदा उघडण्याचा दिनांक :- दिनांक 02-03-2021 दुपारी 12.10

ई-निविदा अनुषंगाने माहिती व सविस्तर निविदा, अर्जाचा नमुना, आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्ती इ. https://mahatenders.gov.in व sahakarayukta.maharashtra.gov.in वर उपलब्ध होतील.

दिनांक :- 15/02/2021

(यशवंत गिरी)

निविदा समिती अध्यक्ष, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,म.रा.पुणे

**ई-निविदा सूचना क्र.1/2021**
**राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे करिता**
**भाडे तत्वावर वाहनचालकासह, इंधनासह, वाहन पुरवठा करणेसाठीचे दर निश्चीत करणेसाठीची ई- निविदा.**

जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक/संवका/ ४०७ /21
दिनांक ९९/ 02 / 2021

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या **निवडणुक कामी दौरा** व दैनंदिन कामाकरीता व विभाग व जिल्हा कार्यालयांना भेटी देण्याकरीता वाहन पुरवठादारांकडून वाहनचालकासह, भाडेतत्वावर वाहन पुरवठा दैनंदिन कामाकरीता व क्षेत्रीय भेटी देण्याकरीता वाहन पुरवठादारांकडून भाडेतत्वावर वाहन पुरवठा करण्यासाठी https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन ई -निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | अंदाजित किमंत रक्कम | सुरक्षा ठेव / डिपॉझीट 3 % | बयाणा रक्कम (EMD) | निविदेची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वाहनचालकासह, भाडे तत्वावर वाहन पुरवठा करणे | रु. 6,00,800/- | मान्य करण्यात आलेले टेडर किंमतीच्या 3% | 6008/- | 1000/- |

- ई-निविदाचे अर्ज विक्रीचा दिनांक : दिनांक 15/02/2021 ते दिनांक 01/03/2021
- ई-निविदा अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक : दिनांक 01/03/2021 दुपारी 12.00 वाजेपर्यंत
- ई-निविदा अर्ज उघडण्याचा दिनांक : दिनांक 01/03/2021, दुपारी 12.05 वाजता.
- ई-निविदा फॉर्म फी व बयाणा रककम हि ऑनलाईन पेंमेट गेट-वे पध्दतीने भरावयाची आहे.
- सदर ई-निविदा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे या ठिकाणी येथे उघडण्यात येतील.

**(अ) पात्रता:**

1. वाहनाचा रंग पांढरा शक्यतो असावा.
2. वाहन पुरवठादार संस्था नोंदणीकृत व दिनांक 31 डिसेबंर 2020 रोजी किमान 3 वर्षे पूर्ण झालेली असावी.
3. संस्थेची वाहनपुरवठा विषयक कामाची आर्थिक वर्ष 2017-18, 2018-19 व 2019-20 या 3 वर्षांचे आयकर रिटर्न्स जोडणे आवश्यक राहील.
4. मागील दोन वर्षात निमशासकीय संस्था/ शासकीय कार्यालये अशा किमान 2 संस्थांना वाहन पुरवठा केल्याचा अनुभव असावा. वाहनपुरवठाबाबतची सेवा समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
5. संस्थेकडे किमान 2 वाहने संस्थेच्या नावाने असावीत व या निविदेपोटी उपलब्ध करुन देणारे वाहन हे दिनांक 1.1.2018 नंतर नोंदणी झालेले असावे. तसेच भाडयाने देण्यासाठी पुरेशी वाहने निविदाकाराकडे उपलब्ध असल्याचे पुरावे निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

**(ब ) सेवांचा दर्जा -**

1. वाहनचालक - वाहन पुरवठादार संस्थेने वाहनासोबत पाठविलेला वाहनचालक किमान 10 वी उत्तीर्ण,चांगली वर्तणूक असलेला पांढरा गणवेशधारी आणि वाहतूक कायद्यांची तसेच शहरातील रस्ते व मार्गांची माहिती

असलेला, वाहन चालविणेचा राज्य परिवाहन विभागाचा वैध परवाना व अन्य आवश्यक ती कागदपत्रे असणारा असावा. वाहन चालकास विहित परवान्यासह किमान तीन वर्षांचा अनुभव असावा. वाहनचालकाचे वय 55 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

2. दूरध्वनीचे पाठबळ - संस्थेकडे 24 तास संपर्कासाठी आवश्यक ते पुरेसे दूरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.तसेच संस्थेने विशिष्ट व्यक्तीकडे (प्रतिनिधी) संपर्क ठेवण्याची जबाबदारी सोपविणे आवश्यक आहे. राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने केलेले फोन घेणे पुरवठादार संस्थेचे प्रमुखावर अथवा संस्थने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीवर बंधनकारक राहिल.

3. राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे अल्प कालावधित दूरध्वनीद्वारे वाहनाची मागणी करु शकेल व अशी मागणी झाल्यानंतर त्वरित वाहन पाठविण्याची व्यवस्था झाली पाहिजे अन्यथा अन्यव्यवस्थेव्दारे उपलब्ध करुन घेतलेल्या वाहन भाड्याचा संपुर्ण खर्च तसेच प्राधिकरण ठरवेल तशी दंडात्मक रक्कम ही संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

4. विमा व कागदपत्रे - संस्थेची ही जबाबदारी असेल की, वाहनाचा व वाहनातील प्रवाशांचा थर्ड पार्टी संपुर्ण विमा (Full Insurance) काढावा व विम्याची कागदपत्रे गाडीसोबत ठेवावी व विम्याचा पुरावा निविदेसोबत सादर करावा.

5. अपघात हाताळणी – वाहन भाडे तत्वावरील सेवा पुरवितेवेळी वाहनास किंवा ति-हाईतांचे अपघात होऊन नुकसान झाले तर राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण होणाऱ्या नुकसानीस जबाबदार राहणार नाही. या संबंधीची संपूर्ण जबाबदारी ही वाहनपुरवठादार संस्थेवर राहील.

6. वैधानिक जबाबदारी - संस्थेने सेवा पुरविण्यासंबंधिच्या सर्व वैधानिक जबाबदा-यांची पूर्तता करावयाची आहे.

7. अंतर मोजण्याची पध्दत - अंतर मोजण्याकरिता राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे मुख्य कार्यालय हे सुरुवात व शेवटचा टप्पा असेल. अंतर व वेळ या पध्दतीने मोजण्यात येईल. पुरवठादाराचे कार्यालयापासून प्राधिकरणाचे कार्यालयापर्यंत व वापर झाल्यानंतर प्राधिकरण कार्यालयापासून पुरवठादाराचे कार्यालर्यापर्यंतचे किलोमीटर व वापर रक्कम अदायीसाठी गणना केला जाणार नाही.

8. रुजू होण्याची वेळ – राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने मागणी केल्यानंतर वाहन सांगितलेल्या ठिकाणी जास्तीत जास्त एका तासात पोहोचले पाहिजे.

9. प्रवासाचा मार्ग - प्रवास हा शक्य तो जवळच्या मार्गाने करावा. सेवेत असताना वाहन जर नादुरुस्त झाले तर दुसरे वाहन त्वरित पाठविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.जर बदली वाहनाची व्यवस्था वेळेत केली नाही तर दुसरी व्यवस्था करण्यात येईल व त्यासाठी द्यावी लागणारी किंमत वाहन पुरवठादार संस्थेस द्यावयाच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

10. टोल टॅक्स व प्रवेश कर - टोल टॅक्स, प्रवेश कर किंवा हद्द पार करण्यासाठी आवश्यक ते परवाना शुल्काची प्राधिकरण परतफेड करेल मात्र त्याकरिता मूळ पावत्या प्राधिकरणाकडे सादर कराव्या लागतील

11. वाहनासंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधित वाहनचालकासोबत असतील.

12. भाडे पध्दतीने पुरविलेल्या वाहनाच्या सर्व दुरुस्तीचा खर्च हा वाहन पुरवठादार संस्थेने करावयाचा आहे.

13. भाड्याने द्यावयाच्या वाहनासाठी प्रादेशीक परिवहन खात्याने विहीत केलेले सर्व नियम (नॉर्मस्) हे वाहनाबाबत परिपूर्ण असावेत.

14. मासिक भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या वाहनाची एका महिन्यामध्ये 2000 कि.मी. पेक्षा कमी झाल्यास मान्य झालेल्या प्रति कि.मी. दराने किमान 2000 कि.मी. ची होणारी रक्कम संबंधितास देण्यात येईल.

15. वाहन भाड्याची परिगणना 2000 किमी. या पध्दतीने होणार आहे सबब वाहनाचा वापर केवळ पुणे मुख्यालय ठिकाणीच होईल अशी धारणा वाहन पुरवठादार संस्थेने ठेवून त्यानुसार दरपत्रक नमूद करु नये.

16. मासिक भाडे तत्वावर पुरवठा केलेले वाहन वेळेवर कामासाठी उपलब्ध न झालेबाबत, पुरविलेल्या वाहन चालकाबाबत अथवा वाहन पुरवठयाबाबत काही तक्रारी निदर्शनास आल्यास किंवा वारंवार वाहन वेळेवर उपलब्ध न केल्यास प्राधिकरण ठरविल त्या दंडाची रक्कम पुरवठादाराकडून वसुल करण्यात येईल. त्याबाबत प्राधिकरणाने घेतलेला दंडाबाबतचा निर्णय अंतीम राहिल.तसेच अश्या प्रकारे केलेला दंड नजीकचे देय बिलातून एकरकमी वसूल केला जाईल. दंडाची आकारणी करुनही वाहन पुरवठयाबाबत तक्रारी बंद न झाल्यास व समाधानकारक सेवा पुरविली न गेल्यास वाहन पुरविणेबाबतचा करार कोणत्याही प्रकारचे कारण व नोटीस न देता एकतर्फी रद्द करणेत येईल.

17. वाहन बाहेरगांवी मुक्कामी राहिल्यास मुक्कामाचे दिवसाचा वाहन चालकाचा भत्ता अनुज्ञेय राहिल. वाहन रात्री उशीरा मुख्यालयी आल्यास वाहन चालकाचा मुक्काम भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

18. वाहन सर्व्हिसिंगसाठी नेल्यास त्याऐवजी अन्य वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल. पुरविण्यात आलेल्या वाहनाच्या टायरची स्थिती उत्तम असावी. झिजलेले, गुळगुळीत गोटा झालेले किंवा फाटके टायर आढळल्यास वाहन परत करण्यात येईल व वाहनाअभावी झालेल्या असुविधेबाबत एकरकमी दंड आकारण्यात येईल.

19. मासिक तत्वावरील वाहनचालकास रविवारी सुटी असेल परंतू आवश्यकता भासल्यास वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल.

20. वाहन पुरविणेबाबत आदेशाचे दिनांकापासून 15 दिवसांचे आंत राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाशी लेखी करार करुन द्यावा लागेल.

21. प्राधिकरण कार्यालय ठरविल त्या पध्दतीने वाहन पुरविण्याबाबत कामकाज करण्यात येईल. याबाबत प्राधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**(क) निविदेसंबंधी अटी व शर्ती**

1. सदर निविदेद्वारे फॉर्म 6 मध्ये नमूद केल्यानुसार ई निविदा न्युनतम दर निश्चीती प्रक्रियेव्दारे दर करार अंतिम करण्यात येतील. मंजूर होणाऱ्या दर करारानूसार प्राधिकरणाच्या सोयीप्रायाणे भाडे तत्वावरील वाहनाचा स्थानिक व बाहेरगावी दौऱ्याकरिता वापर करण्यात येईल.

2. प्राधिकरणास साधारणपणे मासिक भाडे तत्वावर एक वाहन वापरासाठी आवश्यक आहे. वापरकर्ते अधिकारी रजेवर गेल्यास किंवा प्रशिक्षणासाठी गेल्यास व आवश्यकता नसल्यास वाहन त्या कालावधीकरीता बंद करण्यात येईल.

3. सदर दरकरार हा साधारणपणे कार्यरंभआदेश दिनांकापासून पुढे एक वर्षाकरिता राहील. हा कालावधी कंत्राटदाराने यंत्रणेशी करारनामा केल्याच्या दिनांकापासून सुरु होईल.

4. मंजूर झालेले दर हे पूर्ण कालावधीकरिता असतील व इंधनाचा खर्च दर करारामध्ये एकत्रितरित्या समाविष्ट असल्याने स्वतंत्र इंधनाचे देयक / रक्कम अदा करण्यात येणार नाही. तसेच कोणत्याही कारणाने इंधनाचे दर बाजारात वाढले असता दर करारातील मंजूर रक्कमेत वाढ करण्यात येणार नाही.

5. निविदाकाराने तांत्रीक माहिती आणि आर्थिक माहिती स्वतंत्रपणे ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.

6. तांत्रीक माहितीमध्ये **फॉर्म 1 ते 5** मध्ये नमुद केलेली कागदपत्रे अपलोड करावीत व **फॉर्म** 6 मध्ये दरविषयक प्रपत्रे अपलोड करावीत.

7. ज्यांची निविदा मंजूर होणार नाही त्यांची बयाना रक्कम निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परत देण्यात येईल व ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांना मंजूर निविदेच्या वार्षिक एकूण देयक रक्कमेच्या 3% अथवा **रू.** 18100/- यातील जी रक्कम जास्त असेल अशी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडे अथवा शासन चलन नमुना 6 मध्ये कोषगाराकडे जमा करावी लागेल. ही सुरक्षा ठेव निविदेचा एक वर्षाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत या शासनाकडे / प्राधिकरणाच्या खात्यावर ठेवण्यात येईल. त्यावर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

8. फॉर्म 1 ते 5 मधील सर्व कागद पत्रांची पूर्तता झालेली असल्याशिवाय आर्थिक दरपत्रक उघडले जाणार नाही.

9. ज्याची निविदा मंजूर केली जाईल त्याने स्वखर्चाने रू.500/- च्या स्टँप-पेपरवर प्राधिकरणासोबत करारनामा करून देणे आवश्यक राहील. असा करारनामा दुय्यम निबंधक अथवा नोटरी यांचेकडे नोंदणीकृत करुन पुरवठादाराने देणे आवश्यक राहील त्याचा खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे. तसेच करारनाम्यासाठीच्या अटी व शर्ती प्राधिकरण कार्यालय ठरवील.

10. प्राधिकरणास पुरविण्यात येणारे वाहन सुस्थितीत असणे आवश्यक आहे. प्रवासा दरम्यान पुरेसे इंधन भरणे, वाहनांचा विमा उतरविणे, पीयुसी प्रमाणपत्र घेणे, फास्टटॅग (Fast tag) व वाहनात काही बिघाड झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

11. प्रवासादरम्यान वाहनामध्ये बिघाड झाल्यास आवश्यकतेप्रमाणे पर्यायी वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल. मासिक पध्दतीने भाडयाने घेण्यात यावयाचे वाहन प्राधिकरण ठरवून देईल त्याठिकाणी उपलब्ध करून देणे ही कंत्राटदाराची जबाबदारी असेल.

12. कराराची मुदत संपल्यानंतर व संबंधित पुरवठादाराने सुरक्षा ठेव मागणी केल्यानंतर साठ दिवसानंतर अशी सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

13. वाहन सूचित केलेल्या ठिकाणी वेळेत पोहोचले किंवा कसे वाहन दररोज नेमून दिलेल्या ठिकाणी वेळेत जाते किंवा नाही याची खात्री कंत्राटदारास करावी लागेल.

14. दिवसभरात ज्या अधिकाऱ्याने वाहन वापरले अशा अधिकाऱ्याची लॉग बुकवर स्वाक्षरी घेणे व किलोमिटरची नोंद वेळीच करुन घेण्याची जबाबदारी चालकाची असेल. लॉग बुक वरील स्वाक्षरीशिवाय वाहनाची धाव विचारात घेतली जाणार नाही.

**(ड) अन्य महत्वाच्या बाबी**

1. मंजूर निविदाधारकाने जर निविदेप्रमाणे काम करण्यास नकार दिला किंवा कराराचे कालावधीत अटी व शर्तीप्रमाणे काम केले नाही तर सदर बयाणा रक्कम दंड म्हणून जप्त करण्यात येईल.
2. जर कराराच्या मुदतीत दोघांच्या संमतीने वाढ करण्यात आली तर सुरक्षा ठेवीची मुदतही तेवढ्याच कालावधीकरिता वाढविण्यात आली असे गृहीत धरण्यात येईल.

**(ई) निविदांचे ऑनलाईन सादरीकरण**

निविदांचे सादरीकरण खालीलप्रमाणे दोन भागात करणे आवश्यक आहे.

**भाग 1 - तांत्रिक माहिती**

1. संस्थेची माहिती **(फॉर्म** 1)
2. किमान पात्रता फॉर्म (प्रपत्रातील माहितीच्या पुराव्यासह) **(फॉर्म क्र.**2)
3. पूर्वानुभव तपशील माहितीच्या पुराव्यासह **(फॉर्म क्र.**3)
4. कोणताही खटला सुरु नसल्याबाबत अथवा काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र **(फॉर्म** 4)
5. संस्थाचालक अथवा मुख्य अधिका-यांनी निविदा दस्तैवजावर स्वाक्षरी करणेबाबत दिलेले अधिकारपत्र.(फॉर्म 5)
6. तांत्रिक दस्तऐवजाच्या प्रत्येक पानावर अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीने सह्या कराव्यात.

भाग 2 – **व्यापारी लिफाफा- दरपत्रक**

विहीत नमुन्यातील **फॉर्म क्र.** 6 प्रमाणे व पुरवठादाराने / निविदाधारकाने प्रत्येक पानावर सही व शिक्कयासहीत सादर करावेत.

**(फ) निविदा उघडणे**

1. **वेळ व ठिकाण** - प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा **दि.02-03-2021 रोजी दुपारी** 12.10 वा प्राधिकरणाच्या कार्यालयात उघडण्यात येतील. इच्छुक निविदाधारकांना निविदा उघडतेवेळी हजर राहता येईल.
2. तांत्रिक निविदा- प्राप्त निविदा, निविदा समितीच्या समोर उघडण्यात येतील. तांत्रीक निविदा समिती-निविदांची छाननी करेल.
3. वाहन प्रकारात सर्वसाधारणपणे न्युनतम दर नमूद केलेल्या संस्थेस प्रथम चर्चेसाठी बोलविण्यात येईल. निविदाधारकाची अटी व शर्तींप्रमाणे पात्रता तपासण्यात येईल.
4. सेवा पुरविताना नियमितपणा, सचोटी, स्वच्छता, आज्ञाधारकता, गोपनियता व त्वरित कार्यवाहीबाबत कोणतीही तडजोड होणार नाही. जर प्राधिकरणास सेवा पुरविताना दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही झाली नाही तर कोणतीही सूचना न देता करार रद्द करण्यात येईल व जमा असलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.
5. ई-निविदा प्रक्रियेव्दारे दर मंजूर होणाऱ्या (यशस्वी)निविदाधारक व प्राधिकरण अशा दोन्हीकडील प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या असतील. प्राधिकरणाने नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीव्दारे करारनामा करण्यात येणार असल्याने सदर करारान्वये कामाची सुरुवात मंजूर निविदाधारकाने सर्व अटी व शर्ती मंजूर केल्याच्या तारखेपासून सुरु होईल. करारानाम्यातील अटी व शर्तींचे वाहन पुरवठादाराकडून उल्लंघन झाल्यास सदरचा करार रद्द करण्याचे अधिकार पूर्णत: राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास राहतील.
6. देय होणाऱ्या बिलापोटी आगाऊ अग्रिम अदायगी प्राधिकरण करणार नाही.
7. भाडे तत्वावरील पुरविण्यात आलेल्या वाहनाचे देय होणारे मासिक भाड्याचे देयक (Invoice) वाहन पुरवठादार संस्थने प्रत्येक महिन्याचे पाच तारखेपूर्वी प्राधिकरण कार्यालयास बिनचुक सादर करावयाची आहेत. सदर देयकासोबत प्रवेश कर (टोल) व इतर पार्कींगची रक्कम अदा केली असल्यास त्याबाबतच्या मूळ पावत्या सादर करणे बंधनकारक राहिल. प्रवेश कर (टोल) व इतर पावत्याव्दारे मागणी केलेल्या रकमांच्या पावत्या कागदावर चिकटवून बिलासोबत जोडण्यात याव्यांत. तसेच दरमहा वाहन वापराचे सुरुवातीचे व अंतिम किलोमीटर रिडींग 2000 कि.मी.पेक्षा जास्त वापर केलेले कि.मी. नोंद कालावधी स्पष्टपणे समजेल या पध्दतीने डयुटी स्लीपवर नोंदविणे बंधनकारक राहील. लॉग बुक वर तसेच बिलावर/डयुटी स्लीपवर कि.मी. व वापर कालावधी (वेळ) यामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड मान्य केली जाणार नाही.
8. कोणत्याही तक्रारीबाबत सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे यांना निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार असतील व त्यांनी घेतलेल्या निर्णय कंत्राटदारास बंधनकारक राहील.
9. ई-निविदेतील दोन पेक्षा जास्त संस्थांनी नमूद केलेले दर सारखे असल्यास संस्थेची वार्षीक उलाढाल व अनुभव यासारख्या बाबींचा विचार करण्यात येईल.
10. प्राधिकरणास प्राप्त झालेल्या निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार सचिव राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांना राहील. याबाबत निविदाधारकांची कोणतीही तक्रार ग्राहय मानली जाणार नाही.

२१/०२/२०२१

(यशवंत गिरी)
अध्यक्ष
तथा सचिव राज्य
सहकारी निवडणूक
प्राधिकरण

# अर्ज

फॉर्म - 1

प्रति,

मा. सचिव,
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय : भाडे तत्वावर वाहनचालकासह वाहन पुरविण्याकरिताच्या निविदा.**

महोदय,

खाली सही करणाराने उपरोक्त विषयासंबंधातील निविदा, दस्तावेज पूर्णपणे वाचले असून मी/माझी संस्था आपण निर्धारीत केलेल्या अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावर वाहनचालकासह वाहन पुरविण्याकरिता तयार आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | पुरवठादार संस्थेचे नाव | |
| 2 | संस्थेचा नोंदणी क्र. व दिनांक. | |
| 3 | संस्थेचा पूर्ण पत्ता | |
| 4 | या निविदेसंबंधी ज्या व्यक्तीशी संपर्क साधावयाचा आहे त्यांचे नाव पदनाम व पूर्ण पत्ता, मोबाईल क्र. | |
| 5 | पांढऱ्या रंगाचे वाहन उपलब्ध आहे अथवा नाही | |
| 6 | पॅन / टॅन क्रमांक, तपशील | |
| 7 | GST क्रमांक, तपशील | |
| 8 | एस.टी.डी क्रमांकासह दूरध्वनी क्रमांक | |
| 9 | या निविदेसंबंधी ज्या व्यक्तीशी संपर्क साधावयाचा आहे त्यांचा ई-मेल | |
| 10 | अदाता नोंदणी क्रमांक CMP (उपलब्ध असल्यास) | |

खालीलप्रमाणे निविदा दस्तैवज जोडलेले आहेत

1. फॉर्म - 2 संस्थेचा पात्रता तपशील
2. फॉर्म - 3 पूर्वानुभव
3. फॉर्म - 4 प्रतिज्ञापत्र
4. फॉर्म - 5 निविदेसंबंधी संस्थेचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी व सर्व व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिलेले अधिकारपत्र.
5. फॉर्म - 6 दरपत्रक (स्वतंत्र मोहोरबंद पाकीटात)

आपला विश्वासू,
निविदा/पुरवठाधारकाची स्वाक्षरी
नाव व संपर्क क्रमांक

दिनांक
ठिकाण व पदनाम
व्यवसायाचा पत्ता व मोहोर

फॉर्म - 2

## संस्थेचा पात्रता तपशील

| पुरवठादार संस्थेचे नाव :- | | |
|---|---|---|
| 1. | दि. 1.1.2018 नंतर नोंदणी केलेल्या वाहनांचा तपशील | वाहनांचा नोंदणी तपशील खाली नमूद करावा |
| | ....... | |
| | ..................... | |
| | ......................... | |
| 2. | संस्थेची वार्षिक उलाढाल (सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले मागील 3 वर्षाचे टर्नओव्हर सर्टिफिकेट जोडावेत) | संस्थेची उलाढाला रक्कम खाली नमूद करावी ( संस्थेचा टर्न ओव्हर कमीत कमी एका वर्षाकरिता निविदा रक्कमेचा 40% असणे आवश्यक. |
| | आर्थिक वर्ष 2017-18 | रुपये |
| | आर्थिक वर्ष 2018-19 | रुपये |
| | आर्थिक वर्ष 2019-20 | रुपये |
| 3 | मागील कालावधीतील Service Tax/GST, रिटर्न्स / Clearance Cetificate | Service tax / GST भरणा केलेली रक्कम खाली नमूद करावी |
| | आर्थिक वर्ष 2017-18 | रुपये |
| | आर्थिक वर्ष 2018-19 | रुपये |
| | आर्थिक वर्ष 2019-20 | रुपये |
| 4 | GST नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| 5 | Income Tax Returns | TDS/I. tax भरणा केलेली रक्कम खाली नमूद करावी |
| | आर्थिक वर्ष 2017-18 | रुपये |
| | आर्थिक वर्ष 2018-19 | रुपये |
| | आर्थिक वर्ष 2019-20 | रुपये |

**तांत्रिक दस्तऐवजात खालील कागदपत्रे जोडवीत**

1. संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र
2. मालकीच्या वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र
3. सन 2017-18, 2018-19 व 2019-20 जमाखर्च व ताळेबंद – सनदी लेखापालाने प्रमाणित केलेला
4. GST नोंदणी प्रमाणपत्र
5. आयकर / पॅन कार्डची छायांकीत प्रत
6. मागील 3 वर्षांचे आयकर विवरण पत्र
7. सेवा पुरविल्याचे अनुभव प्रमाणपत्र
8. अन्य कागदपत्रे इ.

आपला विश्वासू,

दिनांक

ठिकाण व पदनाम

व्यवसायाचा पत्ता व मोहोर

निविदा/पुरवठाधारकाची स्वाक्षरी
व नाव व संपर्क क्र.

## पूर्वानुभव

**फॉर्म – 3**

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या संस्थेने खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या संस्थांना वाहनसेवा पुरविण्यात आलेल्या असून त्याचा खालील तक्त्यात दिलेला तपशील खरा व बरोबर आहे.

| अ. क्र. | शासनातील /निमशासकीय/खाजगी क्षेत्रांतील संस्थांची नावे व पूर्ण पत्ता व तेथील संपर्क व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक | पुरविलेल्या वाहनांचा प्रकार | वार्षिक भाड्याची रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

दिनांक
ठिकाण व पदनाम
व्यवसायाचा पत्ता व मोहोर

निविदा/पुरवठाधारकाची स्वाक्षरी
व नाव व संपर्क क्रमांक

# प्रतिज्ञापत्र

**(सदरचे प्रतिज्ञापत्र सक्षम अधिकारी / नोटरी यांचेसमक्ष रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर)**

**फॉर्म – 4**

मी ------------------------------------, राहणार ------------------------------------------------------------, वय वर्षे --------------, सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की,

1. मी / आमची/ माझी संस्था-------------------------------------------------------------------------------- चे अन्य भागधारक / संचालक/प्रोपायटर अशा कोणत्याही दावा / खटल्यात गुंतलेलो नाही तसेच आमच्याकडील वाहन कोणत्याही न्यायालयीन खटल्यात गुंतलेले की ज्याचा परिणाम निविदेप्रमाणे सेवा देणेवर होईल.

2. आमच्या संस्थेस भाडे तत्वावर वाहने पुरवठा कामासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक / दंडात्मक कारवाई / शास्ती कोणत्याही शासकीय कार्यालयामार्फत झालेली नाही. आणि अथवा आमचा समावेश केंद्र / राज्य शासकीय खाते, राज्य / केंद्र शासन पुरस्कृत संस्थांकडे काळ्या यादीत नाही.

उपरोक्त माहिती खरी व वस्तूनिष्ठ आहे. ती खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळून आल्यास मी / माझी संस्था भारतीय दंडविधानाच्या कलम 199 व 200 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

प्रतिज्ञाधारक

दिनांक

ठिकाण

(निविदा/पुरवठाधारकाची स्वाक्षरी)
नाव व शिक्का

# अधिकारपत्र
## (संस्थेच्या लेटरहेडवर)

**फॉर्म** - 5

मी ----------------------------------------------, याद्वारे श्री./श्रीमती -----------------------वय वर्षे --------

, राहणार ---------------------------- यांना माझी संस्था ------------------------------------------------ यांच्या

वतीने राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेसाठी **वाहने भाडे त्तवावर पुरवठा करण्यासाठीच्या** निविदेकरीता, निविदेतील विविध कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र प्रमाणित करण्यासाठी तसेच निविदेसंबंधातील सभा/बैठकांस उपस्थित राहून माझ्या संस्थेच्या वतीने निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

श्री. ------------------------------------------ यांच्या सहीचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

स्वाक्षरी<br>
नाव<br>
पदनाम

फॉर्म नं 6

## व्यापारी लिफाफा
## दरपत्रक

निविदाकाराचे/संस्थेचे नांव:- ----------------------------------------

किमान आवश्यक वापर (किलोमीटर) :- 2000 किमी. ,प्रती महिना

**नमूद दर सर्व करांसहित असावेत**

| हलक्या वाहनाचा प्रकार | वाहनाचा प्रकार (मॉडेल नाव व क्रमांक) खालील रकान्यात नमूद करावा | वाहनाचा रंग | **वाहन भाड्याचा एकत्रित दर** 2000 किमी. प्रती महिना (सर्व करांसहित- GST, इंधनासह, वाहनचालक मेहनतान्यासह) एकत्रित | 2000 किमी **वापरानंतर वाहन भाड्याचा प्रति कि.मी दर.** (सर्व करांसहित- GST, इंधनासह, ) | बाहेरगावी प्रत्यक्ष मुक्काम झाल्यास वाहन चालकाचा मुक्काम भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| ( होंडा सिटी, सियाझ, स्विफ्ट डिझायर, होंडा अमेझ, फोर्ड फिगो ॲस्पायर, SX4 Toyota Etios, सुझुकी Ertiga यासारखी वाहने) एसी | | | | | |

दिनांक
ठिकाण व पदनाम
व्यवसायाचा पत्ता व मोहोर

निविदा/पुरवठाधारकाची स्वाक्षरी
व नाव व संपर्क क्र.